Modern Education Society's
**NESS WADIA COLLEGE OF COMMERCE**
19, Prin. V. K. Joag Path, Pune - 411 001. Maharashtra State (India)
Website : www.nwcc.mespune.org
Senior College ID/No. : PU/PN/C/021/1969
Senior College Code No. : 060 Junior College Code No. : J.I 1.15.003
**Re-accredited by NAAC (2023-2028)**
Affiliated to the University of Pune and Recognised by Government of Maharashtra
Recognised Under Section 2(f) and 12(B) of UGC Act, 1956



College (O) : 020-26167024 / 26160909 Fax : 020-26163149 / 26160572 E-mail : nesswadiacollege@gmail.com

**अत्यंत महत्वाचे** **दि.१५.९.२६**

## सूचना

## BBA,BBA(CA),BBA(IB)

## भारत सरकारची महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना २०२६-२७

उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) परीक्षेमध्ये वाणिज्य या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्यु-तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना . उच्च शिक्षण संचालनालय . महाराष्ट्र राज्य पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते.या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे 'Renewal' अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत . नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडुन गुणवत्ता यादि (Merit List) तयार करण्यात येते.विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode' जमा करण्यात येते.

नवीन मंजुरीसाठी (Fresh) ज्या विद्यार्थ्यांचा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या **Top 20th Percentile merit list 2026-27** मध्ये समावेश असेल त्याच विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीसाठी अर्ज ऑनलाईन भरले जातील.सदर विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळावर व प्रसिध्द करण्यात आलेली आहे.शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सूचना **'Guidelines'** व **FAQs** काळजीपूर्वक वाचून सर्व विद्यार्थी कार्यवाही करणे आवश्यक आहे.तसेच सदर योजनेबाबत केंद्रशासनाकडील नवीन/सुधारीत प्राप्त सुचनांसाठी **www.scholarship.gov.in** या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या **www.dhepune.gov.in** या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन विद्यार्थ्यांनी करावे.

किमान पात्रता व अटी

१.अर्जदार हा भारताचा नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२.अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा / स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३.अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ४.५ लाखांपेक्षा जास्त नसावे.
४.सदर शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर. व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यसक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे.मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम. तसेच पत्राद्वरा व दूरस्थ शिक्षणासाठी **'Diploma Correspondence Courses & Distance Education'** ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५.केंद्र शासनाच्या नियमानुसार वाणिज्य अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५वर्षांपर्यंत देय राहील.

Modern Education Society's

**NESS WADIA COLLEGE OF COMMERCE**

19, Prin. V. K. Joag Path, Pune - 411 001. Maharashtra State (India)
Website : www.nwcc.mespune.org
Senior College ID/No. : PU/PN/C/021/1969
Senior College Code No. : 060 Junior College Code No. : J.I 1.15.003
**Re-accredited by NAAC (2023-2028)**
Affiliated to the University of Pune and Recognised by Government of Maharashtra
Recognised Under Section 2(f) and 12(B) of UGC Act, 1956



College (O) : 020-26167024 / 26160909 Fax : 020-26163149 / 26160572 E-mail : nesswadiacollege@gmail.com

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे ः

**नविन मंजुरी (Fresh)**१. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.

२.पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या आधिका-याकडील वार्षिक उत्पन्नाचे (२५-२६)प्रमाणपत्र

३.**Bonafide Certificate**

**शिष्यवृत्तीचे नूतनीकरण (Renewal)**

१.मागील वर्षाची गुणपत्रिका.२. Bonafide Certificate

**नविन मंजुरी व नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी www.scholarship.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे.विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३०.०९.२०२६ ही आहे.**

सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती ऑनलाईन अर्ज भरून सर्व कागदपत्रासह मुदतीत शिष्यवृत्ती काउंटर नं ३ वर जमा करावा

**अधिक माहितीसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २६ - २७ महाराष्ट्र शासना ची जाहिरात**

**Top २० Percentile students list वेबसाईट (www.dhepune.gov.in)** पहावी.

Ness Wadia College of Commerce Pune-1.

प्राचार्या

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, ४१२, ई बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-१६

web : www.dhepune.gov.in फोन नं. ०२०/२९७०७०९८ E-mail- schol.dhepune@gov.in

क्र.उशिंस -शिष्य/ सीएसएस/२०२६-२७/E-3036608 दि. /०७/२०२६

**परिपत्रक**

**विषय : सन २०२६-२७ साठी १०० टक्के केंद्रशासन पुरस्कृत महाविद्यालय व विद्यापीठामधील विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीची अंमलबजावणी करणेबाबत..**

संदर्भ : केंद्रशासनाचे दिनांक १८/०५/२०२६ रोजीचे पत्र.

उच्च माध्यमिक (इयत्ता १२) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान व व्यावसायिक (Vocational) या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षण प्रोत्साहन योजने अतंर्गत सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी नविन मंजुरीचे आणि नुतनीकरणाचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने नॅशनल स्कॉलरशिप पोर्टवरून (एन.एस.पी) मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजुरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merti List) तयार करण्यात येते. विद्यार्थ्यांना मंजुर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

केंद्रशासनामार्फत नुतनीकरण (Renewal) विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची **अंतिम मुदत दि.३०/०९/२०२६** अशी निर्धारित करण्यात आलेली आहे.

शिष्यवृत्ती बाबतच्या संकेतस्थळावरील मार्गदर्शक सुचना (Guidelines) व FAQs काळजीपूर्वक वाचून त्यानुसार सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर योजनेबाबतच्या केंद्रशासनाकडील नवीन/ सुधारीत प्राप्त सुचनांसाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळाचे व या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी महाविद्यालयांनी व विद्यार्थ्यांनी अवलोकन करावे .

**किमान पात्रता अटी**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा राहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/ स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदारच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रू ४.५ लाखा पेक्षा अधिक नसावे.

४. सदर शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे.
५. सदर शिष्यवृत्ती योजना कोणताही Diploma, Correspondence Course & Distance Education साठी लागू नाही.
६. केंद्रशासनाच्या नियमानुसार, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी व वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ४ वर्षे व कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत सदर शिष्यवृत्ती देय राहील.

**<u>अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे</u>**

**नुतनीकरण (Renewal)**

१.मागील वर्षाची गुणपत्रिका

२. Bonafide certificate

**<u>नुतनीकरण (Renewal) विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती</u>**

१. सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नुतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.
२. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम **मुदत ३०/०९/२०२६** ही आहे.
३. ज्या विद्यार्थ्यांकडे आधार क्रमांक आहे अशा विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्याचा वापर करून अर्ज भरावा.
४. तसेच शिष्यवृत्ती योजनेचा अर्ज भरणे करिता **एक वेळ नोंदणी क्रमांक** (OTR) व फेस-ऑथेंटिकेशन करणे आवश्यक असल्याने त्याबाबतच्या मार्गदर्शक सुचना नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदरहू ओटीआर क्रमांकद्वारे विद्यार्थ्यांनी नूतनीकरणाचे (Renewal) शिष्यवृत्ती अर्ज भरावेत.
५. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे लाभ मिळणेसाठी आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे. ज्यामुळे लाभार्थी विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीची रक्कम सुरळीत पणे जमा होण्यास मदत होईल.
६. विद्यार्थ्यांचा बँक खाते चालु स्थितीत असणे (Operative/Active Mode) आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.
७. विद्यार्थ्यांचे बँक खाते स्वत:च्या नावार असणे आवश्यक आहे जॉईट खाते नसावे, खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरतेवेळी विद्यार्थ्यांकडून चुक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास/ न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.
८. ऑनलाईन अर्ज भरण्यापुर्वी विद्यार्थ्योंनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepages वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच अर्ज भरावा.
९. ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पुर्णपणे भरून, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रपासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाही करिता सादर करावी.

१०. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निमार्ण झाल्यास आपल्या महाविद्यालय/संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या/ संस्थेच्या मदतीने पुर्ण करून घ्यावा.

११. एखादा पात्र विद्यार्थी नुतनिकरणासाठी अर्ज करावयाचा राहीला असेल तर पुढील वर्षी अर्ज करण्यास पात्र असेल. ( परंतु ज्या वर्षाचा अर्ज करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही)

१२. एखादया पात्र विद्यार्थ्यांचा नुतनिकरणासाठी अर्ज महाविद्यालय स्तरावर पडताळणी करावयाचा राहीला असेल तर सर्व अशा विद्यार्थ्यांना पुढील वर्षी योजनेसाठी अर्ज भरता येईल. (परंतु ज्या वर्षाचा अर्ज पडताळणी करण्याचा राहीला आहे त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही.)

१३. एखादा पात्र नुतनिकरण विद्यार्थीने महाविद्यालय बदलुन दुस-या नवीन महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास अशा विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर आपले महाविद्यालय बदलण्यासाठी उच्च शिक्षण, संचालनालय, पुणे यांचेकडून बदल करून घेतल्यानंतर अर्ज भरवा.

१४. नुतनिकरणाच्या विद्यार्थ्यांने अर्ज भरतेवेळी मागील वर्षी ५० टक्के घेणे आवश्यक असून सर्व विषयामध्ये उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (ATKT विद्यार्थी सदर योजनेचा अर्ज भरण्यास पात्र नाहीत.)

१५. तसेच विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती महाविद्यालयात असणे आवश्यक आहे व विद्यार्थ्यावर कोणताही गुन्हा दाखल नसावा.

**<u>विद्यापीठ/ महाविद्यालय/संस्थेसाठी सूचना</u> :-**

विद्यार्थ्यांनी नुतनीकरणचा (Renewal) ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांने अर्जा सोबत जोडलेल्या कागद पत्रांवरून अर्जांची छाननी करून ऑनलाईन मंजुरी देण्याची कार्यपध्दती पार पाडावी. तसेच मंजुर केलेले अर्ज व त्या सोबतची कागदपत्रे जतन करून ठेवण्यात यावीत तपासणी अंती समितीस उपलब्ध करून देण्यात यावी. संबंधित महाविद्यालयांना विभागाने दिलेल्या युजर. आय.डी. व पासवर्ड वापरून विहित केलेल्या वेळेत लॉगीन करावे व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज विहीत मुदतीतच पुढील स्तरावर ऑनलाईन फॉरवर्ड करावेत. अन्यथा मुदतीनंतर महाविद्यालय स्तरावरील सदरअर्ज अपात्र समजण्यात येतील.

सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती सन २०२६-२७ साठी प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित कुलसचिव/ प्राचार्य/ संस्थाप्रमुख यांची असेल. अर्जदाराच्या सोयीसाठी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचना व SOP (standard operating procedure) www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील.

तरी आपल्या अधिनस्त महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, व विद्यापीठे यांना आपल्या स्तरावरून सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सुचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती या संचालनालयास देण्यात यावी.

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 13-08-2026 19:16:54

**( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )**
प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट राज्य, पुणे-०१६


प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

प्रत,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१
२. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसलेनगर, भांबुर्डा, पुणे-०५
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई-०१
४. संचालक,आयुर्वेद व युनानी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१
५. संचालक, आरोग्य संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट राज्य, पुणे
६. कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राजय (कृषी/अकृषित/तंत्र/ पशुविज्ञान/ आरोग्य विज्ञान)

२/- सदर शिष्यवत्तीसाठी आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयांमधील विद्यार्थीही पात्र असल्याने सदरचे परिपत्रक आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. तसेच याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात.


NSP National Scholarship Por
All Scholarships
FAQs
Announcements
Helpdesk
Department of School Education & Literacy
Department of Higher Education
PM-USP - Central Sector Scheme Of Scholarship For College And University Students (CSSS) (Merit Based Scheme)
Scheme Open from (for Renewal): 01-06-2026
Student Application Open till (for Renewal): 30-09-2026
Defective Application Verification Open till (for Renewal):15-10-2026
Institute Verification Open till (for Renewal):15-10-2026
DNO/SNO/MNO Verification Open till (for Renewal):30-10-2026
Specifications
FAQ
Ministry of Tribal Affairs
North Eastern Council(NEC),DoNER
Search
ENG
IN